**नि.क्र.४८ वर आदेश**
**(दि.०६.१२.२०१९)**

प्रतिवादी क्रं.५ हिने सदरच्या दाव्यात दस्ताऐवज सादर करण्याकरीता परवानगी मागीतली आहे. प्रतिवादी क्रं.५ हिच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं.५ हिला सदरच्या दाव्यात महत्वाचे दस्ताऐवज दाखल करायचे आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, प्रतिवादी क्रं.५ हिचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) वादी हिच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, सादर केलेले सर्व दस्ताऐवज हे बेकायदेशीर असुन त्यावरून प्रतिवादी क्रं.५ ही मयताची पहिली पत्नी असल्याचे सिध्द होत नाही. तसेच, प्रतिवादी क्रं.५ हिने जाणीवपुर्वक अंतरिम अर्जावर होणारा आदेशास विलंब व्हावा म्हणुन सदरचा अर्ज सादर केला आहे. त्यामुळे वादी हिचा सदरच्या अर्जावर तिव्र आक्षेप असुन तो खारीज करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३) प्रतिवादी क्रं.४ यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, सदरच्या अर्जावर त्यांचा तिव्र आक्षेप आहे.

४) सदरचा दावा हा तात्पुरत्या मनाई हुकूमनाम्यावर सुनावणीकरिता प्रलंबित आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.५ हिने सादर केलेले दस्ताऐवज हे अभिलेखावर घेतल्यास वादी हिचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येतो.

अहमदपूर.
दिनांक : ०६.१२.२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S.Kodgire |
| Dictated on | : | 06.12.2019 |
| Checked on | : | 06.12.2019 |
| Signed on | : | 06.12.2019 |
| Uploaded on | : | 06.12.2019 |